MHAU060023352022

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३८७/२०२२ मधील निशाणी १६ वरील आदेश</u>**
**(विलास आसाराम गिरी वि. कल्याण आसाराम गिरी व इतर)**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने वादी व प्रतिवादी यांचेमधील वाद मिटण्यासाठी वाद मिळकतीची कोर्ट कमिशनरमार्फत मोजणी होवून तसा अहवाल दाखल करणे करीता कोर्ट कमिशनरची नियुक्ती करण्यात यावी, याकरीता दाखल केलेला आहे.

**<u>अर्जातील थोडक्यात कथन असे कीः</u>–**

२. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द मौजे टाकळी (ल.) ता. कन्नड जि. औरंगाबाद शिवेतील जमिन गट क्र.–४ एकुण क्षेत्रफळ ४ एकर ११ गुंठे व पोट खराब १५ गुंठे पैकी ५ आर या क्षेत्रास प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये या करिता मनाई हुकूमाचा दावा दाखल केलेला आहे.

३. सदर अर्जामध्ये प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, दाव्यातील परिच्छेद क्र. २ मधील वादीने वारसाने आलेली दावा मिळकती पैकी ७४ आर जमिन ही शिवना टाकळी प्रकल्पात संपादित करण्यात आलेली आहे. सदरील जमिनीचा मावेजा हा वादी व प्रतिवादी क्र.१ यांना मिळालेला आहे व प्रकल्पात जमिन संपादित झाल्याबाबत फेरफार क्र. ८७९ मंजुर करण्यात आलेला आहे. संपादित झालेल्या ७४ आर जमिनीच्या चतुःसिमा दाव्यात नमुद करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे वादीची ५ गुंठे जमिन कुठे आहे याचा बोध होत नाही.

४. सदर अर्जामध्ये प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, दाव्यातील परिच्छेद क्रं. ४ मधील २ हेक्टर ७९ आर जमिन धरण्याच्या शेतीसाठी संपादित करण्यात आलेली होती. परंतु त्याची नोंद महसुल अभिलेखात लवकर घेण्यात आलेली नव्हती. सदरील फेरफार क्र. १३५६ हा दिनांक ०५.०७.२०२२ रोजी मंजुर करण्यात आलेला आहे. गट क्र. ४ मधील २ हेक्टर ७९ आर जमिन संपादित क्षेत्राची चतुःसिमा नमुद केलेली नसल्यामुळे वादीने ५ आर क्षेत्राची चतुःसिमा चुकीची दर्शविल्यामुळे ७/१२ उताऱ्यात जरी ५ आर क्षेत्राची नोंद वादीच्या नावाने असली तरी जायमोक्यावर ५ आर क्षेत्र हे अस्तित्वात नाही. म्हणुन वादी व प्रतिवादींच्या क्षेत्राच्या चतुःसिमेची कोर्ट कमिशनरची नेमणुक होवून अहवाल मागविणे करीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

५. सदर अर्जावर वादी यांनी निशाणी क्र. १८ कडे आपले म्हणणे दाखल करुन अर्जातील सर्व कथने अमान्य केली आहेत व असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी पुरावा गोळा करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यात वादी यांनी नजरी नकाशा दाखल केलेला आहे. त्यावरुन ५ गुंठे जमिनीच्या चतुःसिमेच्या कल्पना व माहिती मिळु शकते. तसेच धरणात संपादित झालेल्या जमिनीच्या फेरफार क्र. १३५६ घेण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांना जर धरणात गेलेली चतुःसिमा मिळवायची असेल तर त्याचा नकाशा मे. जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे मिळु शकतो. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी त्यांच्या म्हणण्यानुसार वाटणी पत्र दिनांक १८.०१.१९९९ रोजी करुन दिलेले आहे. त्यातील कलम ३ मधील मजकुरात ५ गुंठे जमिनीचा स्पष्टपणे उल्लेख वादीच्या नावे करण्यात आलेला आहे. सदरील वाटणी पत्रकाचा उल्लेख हा लेखी निवेदनातील कलम ६ मध्ये आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

६. प्रस्तुत अर्ज, त्यासोबतचे प्रतिज्ञापत्र तसेच वादी यांनी दाखल केलेले म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

७. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल करुन असे कथन केले आहे की, फेरफार क्र. १३५६ प्रमाणे गट क्र. ४ मधील २ हेक्टर ७९ आर जमिन संपादित क्षेत्राची चतुःसिमा नमुद केलेली नसल्यामुळे तसेच वादी यांनी ५ आर क्षेत्राची चतुःसिमा चुकीची दर्शविल्यामुळे ७/१२ उताऱ्यात जरी ५ आर क्षेत्राची नोंद वादीच्या नावे असली तरी ५ आर क्षेत्र हे जायमोक्यावर अस्तीत्वात नाही. तसेच मंजुर झालेल्या फेरफार मध्ये वादी व प्रतिवादी यांच्या चतुःसिमा नमुद केलेल्या नाही. फक्त ७/१२ उताऱ्यावर वादी यांच्या नावाचे नोंद असल्याचे गैरफायदा घेवून मनाई हुकूम घेण्याच्या तयारीत वादी आहेत. सबब, वादी व प्रतिवादी क्षेत्राच्या चतुःसिमेची कोर्ट कमिशनरची नेमणुक होवून अहवाल मागविणेची विनंती केलेली आहे. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी यांनी सदरचा दावा मौजे टाकळी ता. कन्नड शिवेतील जमिन शेत गट नं. ४ पैकी ५ आर क्षेत्र ज्याची चतुःसिमा पुर्वेस व उत्तरेस प्रतिवादी क्र.१ ची ५३ आर जमिन, पश्चिमेस टाकळी–चापानेर रोड, दक्षिणेस उजव्या कालव्याचा पाट या मिळकतीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करु नये व निरंतर ताकीदी करीता दाखल केलेला आहे. सदर चतुःसिमेतील मिळकत व त्यावरील वादी यांचा ताबा शाबीत करण्याची प्रथमदर्शनी जबाबदारी वादी यांच्यावरती आहे. अभिलेखाचे अवलोकन करता पुढे असे दिसून येते की, दावा मिळकती पैकी ७४ आर जमिन तसेच २ हेक्टर ७९ आर जमिन ही शिवना टाकळी मध्यम प्रकल्पात संपादित करण्यात आलेली आहे व त्याबाबतचा फेरफार क्र.८७९ व १३५६ मंजुर करण्यात आलेला आहे. सदर दाव्यातील मिळकतीपैकी शिवना टाकळी प्रकल्पात संपादित झालेल्या जमिनीच्या चतुःसिमा, नकाशा व इतर संबंधित कागदपत्रे हे मे. जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे मिळु शकतात. सदर दावा हा वादी यांनी निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल

केलेला आहे. सदर दाव्यात वादी व प्रतिवादी यांनी कोणत्याही प्रकारचे एकमेकांच्या मिळकतीत अतिक्रमण केल्याचे कथन केलेले नाही तसेच वादी यांनी गट क्र. ४ पैकी ५ आर क्षेत्राच्या चतुःसिमा, नजरी नकाशा तसेच वाटणी पत्र दाखल केलेले आहेत. सदर दावा, चतुःसिमासह दाव्यातील मिळकत त्याचा ताबा शाबीत करण्याची जबाबदारी वादीवर असल्याकारणाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

**१.** अर्ज निशाणी क्र.१६ नामंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by ANNAPURNA ISHWARA AWATI
Date: 2023.06.12 12:48:43 +0530

**( श्रीमती अ.ई.आवटी )**
सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर,
कन्नड.

ठिकाणः कन्नड.
दिनांकः ०७.०६.२०२३.

## <u>प्रमाणपत्र</u>

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. आदेश या मधील सर्व मजकुर मुळ आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | :- | **श्रीमती अ. ई. आवटी,**<br>सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),<br>तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड. |
| लघुलेखकाचे नांव | :- | -- |
| टंकलेखकाचे नांव | :- | एल.बी.आडे (कनिष्ठ लिपीक) |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | :- | ०७.०६.२०२३ |
| न्यायिक अधिकाऱ्यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | :- | ०७.०६.२०२३ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :- | १२.०६.२०२३ |
| निकालपत्रावर डिजीटल स्वाक्षरी केलेचा दिनांक | :- | १२.०६.२०२३ |

----------------------------